**महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे ४११ ००४.**

# प्रकटन

**विषय : माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ. १० वी) परीक्षा मार्च २०१९ चा निकाल**

---

मंडळामार्फत मार्च २०१९ मध्ये घेण्यात आलेल्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) परीक्षेचा निकाल मंडळाच्या कार्यपध्दतीनुसार जाहीर करण्यात येत आहे. त्याचा तपशील पुढीलप्रमाणे आहे.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या पुणे, नागपूर, औरंगाबाद, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर व कोकण या नऊ विभागीय मंडळांमार्फत मार्च २०१९ मध्ये घेण्यात आलेल्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) परीक्षेचा निकाल मंडळाच्या कार्यपध्दतीनुसार अधिकृत संकेतस्थळांवर **शनिवार, दिनांक ०८/०६/२०१९ रोजी दुपारी ०१.०० वाजता ऑनलाईन जाहीर करण्यात येत आहे.**

माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) मार्च २०१९ परीक्षेस प्रविष्ठ झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचे विषयनिहाय संपादित केलेले गुण खालील संकेतस्थळांवरुन उपलब्ध होतील व सदर माहितीची प्रत (प्रिंट) घेता येईल. **मंडळाच्या अधिकृत संकेतस्थळांचे पत्ते पुढीलप्रमाणे आहेत.**

1. **www.mahresult.nic.in**
2. **www.sscresult.mkcl.org**
3. **www.maharashtraeducation.com**

माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) परीक्षा मार्च २०१९ चा निकाल एसएमएस सेवेद्वारे मोबाईल फोनवरुन खालील मोबाईल ऑपरेटरद्वारे उपलब्ध होतील.

## Mobile short code.

| Service provider | Mobile operator | Short code to send SMS | SMS format |
|---|---|---|---|
| Bsnl | Bsnl | 57766 | MHSSC <space> <seatno> and send to Short Code 57766 |

**www.mahresult.nic.in** या संकेतस्थळावर विद्यार्थ्यांच्या निकालाबरोबरच वेगवेगळी सांख्यिकी माहिती उपलब्ध होईल.

**सदर निकालाबाबतचा अन्य तपशील पुढीलप्रमाणे-**

१) ऑनलाईन निकालानंतर लगेचच दुसऱ्या दिवसापासून गुणपडताळणी व छायाप्रतीसाठी अर्ज करण्याची सोय उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. यासाठी आवश्यक त्या अर्जाचा नमुना मंडळाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आलेला आहे. संकेतस्थळावरील अर्जाची प्रत काढून अर्ज भरता येईल. यासंदर्भात आवश्यकता असल्यास माहितीसाठी

संबंधित विभागीय मंडळाकडे संपर्क साधावा. गुणपडताळणीसाठी संकेतस्थळावरील गुणपत्रिकेच्या स्वसाक्षांकीत प्रतीसह **सोमवार, दिनांक १०/०६/२०१९ ते बुधवार, दिनांक १९/०६/२०१९** पर्यंत विहीत शुल्क भरून अर्ज करता येईल व छायाप्रतीसाठी **सोमवार, दिनांक १०/०६/२०१९ ते शनिवार, दिनांक २९/०६/२०१९** पर्यंत विहीत शुल्क भरून अर्ज करता येईल.

२) **मार्च २०१९ परीक्षेमधील उत्तरपत्रिकांचे पुनर्मूल्यांकन करण्यासाठी प्रथम उत्तरपत्रिकेची छायाप्रत घेणे अनिवार्य असून छायाप्रत मिळाल्याच्या दुसऱ्या दिवसापासून त्यापुढील पाच कार्यालयीन कामाच्या दिवसांत पुनर्मूल्यांकनाच्या कार्यपध्दतीचा अवलंब करुन विहित नमुन्यात विहित शुल्क भरुन संबंधित विभागीय मंडळाकडे विद्यार्थ्यांना अर्ज करणे आवश्यक राहील. ज्या विद्यार्थ्यांना उत्तरपत्रिकेचे पुनर्मूल्यांकन करावयाचे असेल त्यांनी अधिक माहितीसाठी संबंधित विभागीय मंडळाकडे संपर्क साधावा.**

३) मार्च २०१९ च्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) परीक्षेस सर्व विषयांसह प्रविष्ट होऊन उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी लगतच्या दोन परीक्षांमध्ये म्हणजेच जुलै-ऑगस्ट २०१९ व मार्च २०२० अशा दोनच संधी **श्रेणी/गुणसुधार (Class Improvement Scheme)** योजनेअंतर्गत उपलब्ध राहतील.

(डॉ अशोक भोसले )
सचिव,
राज्यमंडळ, पुणे - ०४.